**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३६८/२०२१</u>**

## <u>निशाण क्र. १९ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र. ९, १० व १२ यांना दाव्याचे सरनाम्यातून वगळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जात वादीचे कथन असे आहे की, त्यांनी सदरचा दावा सरस निरस मानाने वाटप होऊन मिळण्यासाठी व जाहीर होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. ९, १० व १२ यांची नावे वाद मिळकत गट क्र. १३९३ चे ७/१२ पत्रकी नमुद असल्याकारणाने दावा दाखल करताना सामील केलेली होती. मात्र, दि. ०३/०३/२०२५ रोजी सदर वादमिळकतीचा ७/१२ उतारा काढल्यानंतर सदर पत्रकावरुन प्रतिवादी क्र. ९, १० व १२ यांची नावे कमी झाल्याची वादीस माहिती झाली. प्रतिवादी क्र. ९, १० व १२ यांची नावे वादमिळकतीमधून कमी झाल्यामूळे त्यांची सदर दाव्याचे कामी काहीही आवश्यकता नाही. तसेच सदर प्रतिवादींना दाव्यामधून वगळल्यास त्यांचे हक्क व हितसंबंधास कोणतीही हानी पोहचत नाही. सबब, वादीने प्रतिवादी क्र. ९, १० व १२ यांची नावे दाव्याचे सरनाम्यातून कमी करण्याची विनंती केली आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जास प्रतिवादींतर्फे म्हणणे देण्यात आले असून त्यांनी असे कथन केले आहे की, वादीचा अर्ज खोटा व लबाडीचा असून तो प्रतिवादींना मान्य व कबूल नाही. वादीने सदरचा दावा सरसनिरस मानाने वाटप होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादी क्र. ९, १० व १२ हे दावा मिळकतीत सहहिस्सेदार असल्याने त्यांची नावे मुळीच कमी करता येणार नाहीत. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**०४.** उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन पृथक कब्जा वाटप होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यातील वादपत्राचे अवलोकन केले असता वादीस प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्याकडून अनुतोष हवा आहे.

वादपत्रामध्ये प्रतिवादी क्र. ६ ते १२ हे दावामिळकतीमध्ये सहहिस्सेदार असल्यामूळे त्यांना याकामी पक्षकार केले असल्याचे व वादीस त्यांच्याविरुध्द कोणत्याही प्रकारची दाद मागण्याची नसल्याचे नमूद केलेले आहे. वादी विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत प्रतिवादी क्र. ९, १० व १२ यांची नावे दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावरती नमूद केली असल्याकारणाने त्यांना प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी म्हणून सामील केले होते. परंतु, उपरोक्त नमूद प्रतिवादींची नावे दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकावरुन कमी झाल्याचे वादीस दि. ०३/०३/२०२५ रोजी निदर्शनास आल्यामूळे सदर प्रतिवादींचा दाव्याच्या कामी कोणताही हितसंबंध राहीलेला नाही. वादीने सदर अर्जातील कथनाच्या पृष्ठर्थ नि.क्र. २० वर शपथपत्र दाखल केलेले आहे. तसेच, नि.क्र. २१ सोबत गट क्र. १३९३ या मिळकतीचा ७/१२ चे अवलोकन केले असता त्यावर प्रतिवादी क्र. ९, १० व १२ यांची नावे सदर पत्रकावरुन कमी झाल्याचे निदर्शनास येते. प्रस्तुत वादीस सदर प्रतिवादी क्र. ९, १० व १२ यांचेविरुध्द कोणत्याही अनुतोषाची मागणी नसल्याचे निदर्शनास येते. उपरोक्त नमूद प्रतिवादींची नावे दाव्यातून कमी केल्यास दाव्याच्या आशयात व विषयात कोणताही बदल होत नाही. त्यामूळे, प्रतिवादी क्र. ९, १० व १२ यांची नावे दाव्यातून कमी केल्यास त्यांची कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने प्रतिवादी क्र. ९, १० व १२ यांची नावे दाव्यातून वगळून आवश्यक ती दुरुस्ती करुन दाव्याची दुरुस्त प्रत आजपासून १४ दिवसांच्या आत अभिलेखावर सादर करावी.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2025.08.18 16:32:33 +0530

दिनांक – १८/०८/२०२५.

**(एस. एस. साळुंखे)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file of Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | V. A. Dange |
| Court | : | 2nd Jt. C. J. J. D., Sangola. |
| Date | : | 18/08/2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 18/08/2025 |
| Order Uploaded on | : | 19/08/2025 |